भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.२६८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०४/२०१७

१) क्षुल्लक कारणावरुन काचेच्या बाटलीने डोक्यावर मारुन जखमी केले . :—

दिनांक १२/०४/२०१७ चे १९.१५ वा. दरम्यान यातील जखमी फिर्यादी रविन्द्र शेषराव भोरले वय ३८ वर्ष, रा. सरांडी बु. याने आपल्या सायकल दुरुस्तीचे पैसे आरोपीस मागीतले असता आरोपीने तुझे पैसे पचवितो का माझ्या कडे जेव्हा पैसे येतील तेव्हा देईन असे बोलुन भांडण करुन हातात असलेल्या थंड पेयच्या काचेच्या बाटलीने फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहे.

२) टिप्पर चालकांच्या निष्काळजीपणामुळे सिंमेट पोलला धडक लागुन वायरिंग तुटुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक १२/०४/२०१७ चे ०७.२० वा. दरम्यान यातील आरोपी टिप्पर चालकाने आपले ताब्यातील टिप्पर भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन रनाडा येथील डाव्या कालव्यावरील असलेला म.रा.वि.वि.कं. उच्चदाब वाहीनीचे पिएचशी पोलला (सिंमेट कॉकरेटचे पोलला) धडक मारुन सिमेंट पोल तुटल्याने उच्चदाब वाहिनीचे ०२ गाल्याची वायरिंग तुटुन अंदाजे १८,०००/—रु. चे नुकसान झाल्याने फिर्यादी अतुल भैयाजी मोथनकर, वय ३२ वर्ष, रा. गणेश वार्ड पवनी कनिष्ठ अभियंता म.रा.वि.वि कं. आसगाव यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

३) एसटी बसमध्ये अचानक प्रकृती बिघडल्याने इसमाचा मृत्यु . :—

दिनांक १३/०४/२०१७ चे ११.२० वा. दर यातील मृतक भोजराज नत्थुजी गजभिये वय ६५ वर्ष, रा. देवमुंढरी हा खात वरुन एसटी बस मध्ये बसुन भंडाराकडे येत असता खुर्शिपार(मोहदुरा) येथे बस पोहचताच मृतक हा सिटवरुन बसमध्ये पडल्याने त्यास उपचाराकरीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे नेले असता एम. ओ. सा. यांनी तपासुन मृत घोषीत केल्याने फिर्यादी विलास बापुराव नंदनवार वय ४३ वर्ष, रा. रामेश्वर वार्ड रामटेक जि. नागपुर यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कावळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १२/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ५५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१, त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ४७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्हीं. कुलकर्णी)
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता